# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 20/02/2021 (शनिवार)

(दुपार)

---

### अपघातात मृत्यू

पो.स्टे. मौदा :– फिर्यादी नामे– मारोती चंद्रकात क्षीरामे, वय 30 वर्ष, रा. क्षीकृष्ण नगर लातूर ता. जि. लातूर यांच्या कडे बारा चक्का 3118 ट्रक क्र. एम.एच–04/एच.एस.–0965 असून ट्रक वर आरोपी नामे– नानासाहेब शंकर भिंगे, रा. अंकोली ता.जि लातूर हा ड्रायव्हर आहे. दिनांक 19/02/2021 चे 06:30 वा. दरम्यान रायपूर येथुन इंडियन कंपनी मधून फिर्यादीचा वरील ट्रक मध्ये 20 टन लोहाचे ॲगल भरुन फिर्यादी व रामेश्वर कांबळे, वय 22 वर्ष, रा. माडगा असे मिळुन रायपूर वरुन लातूर साठी निघाले. त्यादरम्यान भंडारा नागपूर रोडनी जात असता महालगाव येथे आरोपी ट्रक चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीमणे चालवून समोरील उभे ट्रक क्र एमएच–49/1140 ला मागून धडक दिली. या अपघातात ट्रक मध्ये असलेले लोखंडी ॲगल कॅबीन मध्ये आल्याने रामेश्वर कांबळे यास डोक्याला जबर मार लागल्याने तो गंभीर जखमी झाला. त्यास उपचार कामी मेयो हॉस्पिटल नागपूर येथे भरती केले असता रामेश्वर कांबळे हा मरण पावला. तर फिर्यादी व चालक यांना साधी दुखापत झाली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. मौदा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ), 337, 184 भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री मोहोड मो.क्र 9823910156 हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. काटोल – दिनांक 17/02/2021 चे 20.30 वा. ते 21.00 वा. चे सुमारास पो.स्टे. काटोल हद्दीत फिर्यादीयांची 15 वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहासक फौजदार श्री जवाहर चव्हाण हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर